# State Level Volleyball Tournament Inaugurated

लोकमत

## नागपूर, नाशिक, लातूर, पुणे संघाची विजयी सलामी

### राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेला शानदार सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेच्या मान्यतेने, जळगाव जिल्हा पासिंग व्हॉलीबॉल असोसिएशन आयोजित, नूतन मराठा महाविद्यालय व काशिनाथ पलोड हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ४८ वी राज्यस्तरीय ज्युनिअर मुले आणि मुलींच्या व्हॉलीबॉल विभागीय स्पर्धेला काशिनाथ पलोड हायस्कूलच्या बंदिस्त स्टेडियममध्ये शुक्रवारी सुरुवात झाली. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी मुलींच्या संघांमध्ये चार साखळी सामने खेळविण्यात आले.

स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन जिल्ह्याचे वरिष्ठ शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अशोक चौधरी, महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेचे नीलेश जगताप, महाराष्ट्र संघटनेचे उपाध्यक्ष फारुख शेख व खजिनदार अरविंद गवळी यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून विवेकानंद प्रतिष्ठानचे सहसचिव विनोद पाटील, काशिनाथ पलोडचे प्रशासकीय अधिकारी मिलिंद पुराणिक, डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. अनिता कोल्हे, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अंजली पाटील आदी उपस्थित होते. व्हॉलीबॉल संघटनेतर्फे नीलेश जगताप, अरविंद गवई, वहाब सैयद, अर्शद काजी, दत्ता सोमवंशी, सौरभ रोकडे, नीलेश भत्ते, गौरव खामकर, संकेत गायकवाड, विलास घोडके, मिलिंद पुराणिक व विनोद पाटील यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन हर्षल पाटील व मंजुषा भिडे यांनी केले.



फीत कापून स्पर्धेचे उद्घाटन करताना अशोक चौधरी, नीलेश जगताप, अरविंद गवई, फारुख शेख व अर्शद काझी आदी.

#### राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव

- जळगाव जिल्ह्यातील राष्ट्रीय पातळीवर खेळलेले खेळाडू यात प्रामुख्याने कांचन लाठी, अश्विनी परदेशी, कल्याणी वराडे, सोमेश आटोळे, क्षितिज सोनवणे यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

#### शुक्रवारी झालेले सामने

नागपूर विभाग विरुद्ध अमरावती विभाग यांच्यात झालेल्या सामन्यात नागपूर संघ विजयी झाला. नाशिक विरुद्ध छत्रपती संभाजीनगर यांच्या सामन्यात नाशिक संघ विजयी, लातूर विरुद्ध मुंबई सामन्यात लातूर संघ विजयी तर पुणे विरुद्ध कोल्हापूर संघाच्या सामन्यामध्ये पुणे संघ विजयी झाला.

शब्दकोडे क्र. ८९४

Jalgaon Main
Page No. 4 Dec 02, 2023
Powered by: erelego.com